Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २५६ • Title - Code :- MAHMAR49513 • गुरुवार दि.२७ जून २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## थोडक्यात

### खोटे नरेटिव्ह तयार करायची फॅक्टरी उभारली

**मुंबई**–महाराष्ट्र विधानसभा पावसाळी अधिवेशन उद्यापासून सुरू होत आहे. तत्पूर्वी विरोधकांकडून चहापानावर बहिष्कार टाकला गेला. त्यानंतर सरकारच्या वतीने पत्रकार परिषद घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांनी अधिवेशनाची भूमिका मांडली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, खोट बोल पण रेटून बोल, असे खोटे नरेटिव्ह तयार करून एखाद्या निवडणुकीत यश मिळाले तर आता खोटेच बोलायचे आहे. अशी मानसिकता व अर्विभाव हा विरोधकांचा आहे. किंबहुना त्यांनी दिलेले पत्राचे एका वाक्यात उल्लेख करायचा असेल तर त्यांनी आरशात त्यांचा चेहरा पाहावा', असे ते म्हणाले. विदर्भातील सिंचन प्रश्नावर सरकारवर अपयश, असे म्हणतात. पण हे अपयश हे महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये झाले आहे. मध्यंतरी सरकारमध्ये पैनगंगा प्रकल्पाचे फाईल हलली नाही. त्यांच्या काळात विदर्भातील एका प्रकाल्पाला मान्यता दिली नाही. वैधानिक विकास मंडळ त्यांनी बंद केले पण आम्ही स्वत: त्याला प्रस्ताव देऊन चालू केले. ते आम्हाला विचारतात. वॉटर ग्रीडचे काय झाले. पण त्यांनीच या मराठवाड्यातील वॉटर ग्रीड रोखले होते.

### 'सगेसोयरे'चा अध्यादेश रद्द करा:वंचित बहुजन आघाडीची मोठी मागणी

**मुंबई**–मनोज जरांगे यांच्या नेतृत्वातील मराठा आरक्षणाच्या आंदोलनाला पाठिंबा देणाऱ्या वंचित बहुजन आघाडीने आता मराठा आरक्षणाशी संबंधित 'सगेसोयरे'चा अध्यादेश रद्द करण्याची मागणी केली आहे. या अध्यादेशाद्वारे कायद्यात ढवळाढवळ होत आहे. त्यामुळे हा अध्यादेश तत्काळ रद्द केला जावा. विशेषत: मराठा समाजाला कुणबी दाखल्याचे करण्यात येणारे वाटपही तातडीने थांबवण्यात यावे, असे वंचितने म्हटले आहे. वंचितच्या या भूमिकेमुळे मराठा आरक्षणाच्या समर्थकांत मोठी खळबळ माजली आहे.प्रकाश आंबेडकर यांनी मनोज जरांगेंच्या नेतृत्वातील मराठा आंदोलनाला पाठिंबा दिला होता. त्यांनी आंतरवाली सराटीत जाऊन जरांगेंची भेटही घेतली होती. पण आता त्यांनी मराठा आरक्षणाशी संबंधित सगेसोयरे अध्यादेशाला विरोध दर्शवला आहे. वंचितने छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या १५० व्या जयंतीनिमित्त या प्रकरणी ११ महत्त्वपूर्ण ठराव पारित केलेत. या ठरावाद्वारे पक्षाने सदर अध्यादेश रद्द करण्याची मागणी केली आहे. या ठरावाचे बॅनर वंचितने विविध शहरांतील चौकांत लावले आहे. त्याची माहिती वंचितने एका विस्तृत ट्विटद्वारे दिली आहे.

### केंद्राकडून तपास यंत्रणांचा गैरवापर

**मुंबई**–राज्य विधिमंडळाचे उद्यापासून सुरू होणारे पावसाळी अधिवेशन हे खोके सरकारच्या निरोपाचे अधिवेशन आहे, अशी जळजळीत टीका माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी बुधवारी महायुती सरकारवर निशाणा साधताना केली आहे. ते पदवीधर निवडणुकीचे मतदान केल्यानंतर माध्यमांशी बोलत होते.विरोधी पक्षाला संपवण्यासाठी केंद्रीय तपास यंत्रणांचा मोदी यांनी वापर केला. पश्चिम बंगाल, दिल्ली, झारखंड, महाराष्ट्रासारख्या राज्यांतील मुख्यमंत्री, मंत्री, आमदार, खासदारांना तुरुंगात डांबले. कारण ते भाजपाविरोधी होते. विरोधी पक्षाचा आवाज जपला पाहिजे, देशाला मजबूत विरोधी पक्षाची गरज आहे, असा साक्षात्कार गेल्या दहा वर्षांत मोदी यांना झाला नाही, असे ठाकरे पक्षाने सुनावले आहे.गेल्या दहा वर्षांत मोदी आणि त्यांच्या गुजराती ईस्ट इंडिया कंपनीने देश चालविण्याच्या नावाखाली उत्सव, इव्हेंट, नाटकेच केली. मोदी आता म्हणतात की, देशाला एक जबाबदार विरोधी पक्ष हवा, पण दहा वर्षांत विरोधी पक्ष फोडून त्यांना कमजोर करण्याचे काम मोदी यांनीच केले. देशात विरोधी पक्ष टिकूच द्यायचा नाही.

# नवनीत राणांनी घेतली फडणवीसांची भेट

## भाजपसोबतच इमानदार राहण्याचा विश्वास व्यक्त

## लोकसभा पराभवानंतर तब्बल २३ दिवसांनी भेटीला

**मुंबई (वृत्तसंस्था)–लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर अमरावतीच्या माजी खासदार तथा भाजपच्या उमेदवार असलेल्या नवनीत राणा यांनी तब्बल २३ दिवसानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी त्यांच्यासोबत त्याचे पती तथा आमदार रवी राणा देखील उपस्थित होते. तसेच मी भाजपमध्येच राहणार असून आगामी काळात अधिक जोमाने काम करत राहिल, असा विश्वास देखील नवनीत राणा यांनी भेटीनंतर व्यक्त केले.**



नवनीत राणा म्हणाल्या की, लोकसभा झाल्यानंतर आम्ही भेटलो नव्हतो, आमची भेट झाली नव्हती म्हणून आज भेटायला आले होते. लोकसभा निवडणूक कशाप्रकारे झाली, त्या संदर्भात आजच्या बैठकीत चर्चा झाली. तसेच, मी भाजपची कार्यकर्ता म्हणून काम करणार असून यापुढे पक्षाचं काम करण्याची पद्धत आणि आगामी विधानसभा निवडणुकांमध्ये कसं काम करायचं, कुठली जबाबदारी पार पाडायची, याबाबतही आजच्या बैठकीत चर्चा झाली. पार्टीचा पट्टा जेव्हा गळ्यात घातला, त्यांच्यासोबत नक्कीच मी इमानदार राहणार, अशा शब्दात आपण भाजपातच राहणार असल्याचे राणा यांनी म्हटले.

नवनीत राणा म्हणाल्या की, मला असं वाटतं मी पार्टीची कार्यकर्ता आहे, निवडणुकीत कशामुळे माझ्या जनतेने मला अमरावतीमध्ये थांबवलं हे सांगणं माझं कर्तव्य आहे. देवेंद्र फडणवीसांना ते सांगणे खूप आवश्यक होतं आणि कुठे काय झालं. माझ्याकडून काय चूक झाली, याबाबत चर्चा केली. देवेंद्र फडवणीस माझे नेते आहेत, त्यांना भेटून त्यांच्यासोबत चर्चा करुन बरं वाटलं. निकालानंतर २३ दिवसांनी मी त्यांना भेटले, असेही राणांनी म्हटले.आमदार बच्चू कडू यांच्याबद्दल नवनीत राणा यांना प्रश्न विचारला असता, त्या म्हणाल्या की, मला असं वाटतंय मी कोणावर काही बोलणार नाही, मी माझं काम जनतेसाठी करते, कोणत्या नेत्यासाठी करत नाही. माझ्या जिल्ह्यामध्ये जे काही घडलं, माझं इलेक्शन मी लोकांच्या भरोशावर लढले आहे. मी दुसऱ्या कोणाच्या भरोशावर निवडणूक लढली नाही. निवडणुकीत माझे नेते अमित शहा, देवेंद्रजी आणि मोदीजी माझ्यासोबत होते, ते सर्व जनतेला माहिती आहे.महायुतीचा धर्म पाळला गेला नाही, यावर मी काहीच भाष्य करणार नाही. माझे जे नेते आहेत ते त्याच्यावर भाष्य करतील. पण, मी माझं कर्तव्य इमानदारीने पार पाडलं आहे. मी मोदीजींना अमरावतीमधून जागा देऊ शकले नाही, ती खंत आयुष्यभर माझ्या मनात राहणार आहे. यापुढे पार्टीचा कार्यकर्ता म्हणून काम करणार, इमानदारीने मैदानात उतरणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचं रक्त आमच्यात आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार घेऊन आम्ही या मैदानात आहोत. जोश कधी कमी होतो असं मला वाटत नाही, जो इमानदार आहे तो फक्त लढणं जाणतो, असेही राणांनी म्हटले.मी जे करते ते ओरिजनल आहे, आता ब्रँडला कॉपी करणारे खूप सारे कॉपी घेऊन जातात. पण, ब्रँड हा ब्रँड असतो, असे म्हणत यशोमती ठाकूर यांना टोला लगावला. माझा कोणासोबतही सामना नाही, मी माझ्या जनतेची सेवा करण्यासाठी या क्षेत्रात आली आहे. ती सेवा मी शेवटच्या श्वासापर्यंत करणार, असेही राणांनी म्हटले.लोकसभा निवडणुकीत चुरशीच्या आणि लक्षवेधी ठरलेल्या अमरावती लोकसभा मतदारसंघात नवनीत राणा यांचा जवळपास २८ हजार मतांनी पराभव झाला. येथील मतदारसंघातून काँग्रेसचे बळवंत वानखेडे विजयी झाले आहेत. त्यामुळे, राणा दाम्पत्यास पराभवाचा मोठा धक्का जनतेने दिला आहे. या निवडणुकीतील पराभवानंतर नवनीत राणा यांनी माध्यमांशी बोलणं देखील टाळल्याचे पाहायला मिळाले.

## काँग्रेस पक्षाचे आदिवासी आघाडीचे गडचिरोली जिल्हाध्यक्ष म्हणून हनमंतु गंगाराम मडावी यांची फेरनियुक्ती

**आल्लापल्ली । प्रतिनिधी**



येथील सेवाभावी ,काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि सेवानिवृत्त वन अधिकारी हनमंतु गंगाराम मडावी यांची काँग्रेस पक्षाचे आदिवासी आघाडी विभागाचे जिल्हाध्यक्ष म्हणून फेरनियुक्ती आघाडीचे प्रदेश अध्यक्ष सुरेश चिंचोळकर यांनी २२ जून रोजी केली आहे.

मागील वर्षी डिसेंबर महिन्यात मडावी यांनी माजी जि.प.अध्यक्ष अजय कंकडालवार यांचेसमवेत काँग्रेसचे युवा नेते व राज्याचे विरोधी पक्षनेते ना.विजय वडेट्टीवार यांच्यावर विश्वास दाखल करून आपल्या समर्थकांसह भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात रितसर प्रवेश केला होता.काँग्रेस पक्षात प्रवेशानंतर पक्षाचे हायकमांडने कंकडालवार यांची अहेरी विधानसभा समन्वयक म्हणून तर मडावी यांची आदिवासी आघाडीचे जिल्हाध्यक्ष म्हणून नियुक्ती केली होती.अजय कंकडालवार व हनमंतु मडावी या दोन्ही नेत्यांचे पक्षप्रवेश व नियुक्तीचे फलित लोकसभा निवडणुकीत अहेरी विधानसभा क्षेत्रात मविआ व काँग्रेसचे उमेदवार डॉ.किरसान यांना मिळालेल्या भारी लीडमधून सगळ्यांनाच पाहायला मिळाली.असे असतांना सुद्धा पक्षातील अंतर्गत गटबाजीमुळे आदिवासी आघाडीचे जिल्हाध्यक्ष म्हणून दुसऱ्या एका कार्यकर्त्यांची निवड झाल्याची माहिती सामाजिक माध्यमांवर प्रसारित झाल्याने याबद्दल मडावी समर्थकांमध्ये नाराजी पसरली होती.एकाच पदाचे दोन दोन जिल्हाध्यक्ष निवडीबद्दलची तक्रार राज्याचे विरोधी पक्षनेते यांच्या कानावर पडताच त्यांनी लगेच याविषयी पक्षश्रेष्टींसोबत चर्चा करून परत आल्लापल्ली येथील हनमंतु गंगाराम मडावी यांच्या नावाने आदिवासी आघाडीचे जिल्हाध्यक्ष म्हणून फेरनियुक्ती करायला भाग पाडले.काँग्रेस पक्षाचे आदिवासी आघाडीचे जिल्हाध्यक्ष म्हणून फेर नियुक्ती झाल्याबद्दल हनमंतु मडावी यांनी राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, आघाडीचे प्रदेश अध्यक्ष सुरेश चिंचोळकर,जि.प.माजी अध्यक्ष अजय कंकडालवार, ड.राम मेश्राम,ज्येष्ठ नेते हसनभाई गिलानीसह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे आभार मानले.

## प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत पर्यावरण मुक्त 'डेमो हाऊस'

### जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेद्वारे भविष्यातील घराचा अभिनव उपक्रम




**चंद्रपूर । प्रतिनिधी**

प्लास्टिक कचरापासून एखादे घर बनू शकते, यावर सहजासहजी कोणी विश्वास ठेवणार नाही. मात्र खरच सिंगल युज प्लास्टीक पासून आपण आपल्या भविष्यातील घर बनवू शकतो, हे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने अभिनव उपक्रमातून दाखवून दिले आहे. विसापूर येथील श्रध्देय अटलबिहारी वाजपेयी बॉटनिकल गार्डन येथे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पर्यावरणमुक्त डेमो हाऊसची निर्मिती करण्यात आली आहे.

आपल्या दैनंदिन जीवनात, आपल्या सभोवतालच्या प्रदूषणाची चर्चा करतांना प्लास्टीक कचरा व्यवस्थापन ही एक प्रमुख समस्या आहे. विविध संशोधन अभ्यासानुसार, प्लास्टीकचे विघटन होण्यासाठी २० ते ५०० वर्षे लागतात व ते दीर्घ काळापर्यंत वातावरणात राहते. ज्यामुळे केवळ मानवांसाठीच नाही तर पर्यावरणालाही धोका आहे. या संपूर्ण बाबीचा विचार करतांना जिल्हा परिषद चंद्रपूर व रॅग आय अपसायकलिंग कंपनी चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण डेमो हाऊस बांधकाम अंतर्गत भविष्यातील घर बांधले गेले आहे.पर्यावरणयुक्त असे डेमो हाऊसची संकल्पना चंद्रपूर जिल्हयाचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांचे वतीने करण्यात आली आहे. त्याकरिता वन विभागाकडून बॉटनिकल गार्डन मध्ये ६२५ चौरस फुट जागा उपलब्ध करून देण्यात आली. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा चंद्रपूर व डॉ. बालमुकुंद पालीवाल यांचे रॅग आय अपसायकलिंग कंपनी यांचे संयुक्त विद्यमाने डेमो हाऊस तयार करणात आले आहे.१९ फुट उंच व १० फुट बाजुच्या भिंतीसह ६२५ चौरस फुट क्षेत्रफळावर बांधकाम करण्यात आले असून, १३ टन सिंगल - युज फेकून दिलेले प्लास्टिक अपसायकल करून सदरचे बांधकाम करण्यात आले आहे. भिंतीपासून छतापर्यंतची संपूर्ण रचना सर्व प्रकारच्या अपसायकल प्लास्टिक सामग्रीचा वापर करून तयार केली आहे. अपसायकलींग केलेल्या प्लास्टिक तंतुपासुन बनविलेले उच्च- गुणवत्तेचे इन्सुलेशन साहित्य इष्टतम तापमान नियमन राखते, घरातील वातावरण गरम -थंड करण्यासाठी ऊर्जेचा वापर कमी करते. अपसायकलींग केलेल्या प्लास्टिकचा वापर करून, मोठया प्रमाणात प्लास्टिक कचरा लँडफिलमध्ये जाण्यापासून किंवा नैसर्गिक वातावरणास प्रदूषित करण्यापासून प्रतिबंधित करते.ग्रामीण भागामध्ये बांधकाम करण्यात येणारे घरकुले, वरील नमुद केल्यानुसार सिंगल -युल- प्लास्टिक पासून केल्यास ग्रामीण भागात प्रदुषण होणार नाही व गांव पर्यावरणयुक्त राहण्यास मदत होईल. ग्रामीण भागात गोळा होणारा वेस्ट प्लास्टिक, बचत गटामार्फत संकलित करून संस्थेला आणून दिल्यास, या वेस्ट प्लास्टिक पासून विविध प्रकारच्या वस्तु तयार करून देण्यात येईल, असे डॉ. पालीवाल सांगितले आहे.यासर्व बाबीचा विचार करतांना आपणास पर्यावरण संतुलन ठेवणे आवश्यक असल्याने, भविष्यात घरे बांधकाम करतांना सिंगल- युज -प्लास्टिक पासून घरे बांधकाम करण्याचे आवाहन जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. सुभाष पवार यांनी केले आहे.

## पीक कर्ज प्रक्रियेच्या सुलभतेसाठी स्थानिक अधिकारी द्या

## पालकमंत्री ना.सुधीर मुनगंटीवार यांचे केंद्रीय अर्थमंत्र्यांना पत्र

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर सद्यस्थितीत राज्यात खरीप हंगामाला सुरवात झाली आहे. हा हंगाम शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा असून बी-बियाणे, खते आदींकरीता शेतकऱ्यांना पीक कर्जाची अत्यंत आवश्यकता आहे. मात्र जिल्ह्यातील काही राष्ट्रीयकृत बँकांमध्ये परराज्यातील विशेषत: दक्षिण भारतातील बँक अधिकारी असल्याने स्थानिक शेतकऱ्यांसोबत संवाद साधताना अडचणी निर्माण होतात. सदर बाब राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या निदर्शनास आली. त्यामुळे पालकमंत्री मुनगंटीवार यांनी प्राधान्याने केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारमन यांना पत्र लिहून पीक कर्जवाटप प्रक्रियेच्या सुलभतेसाठी स्थानिक भाषेची जाण असणारा बँक अधिकारी देण्याची विनंती केली आहे.

राज्यातील चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नंदूरबार हे जिल्हे दुर्गम म्हणून ओळखले जातात. येथे बँक व्यवस्थापकांची कमतरता असून शेतकऱ्यांना वेळेत पीककर्ज वाटप करणे, हे आव्हान आहे. त्यातच काही बँकामध्ये इतर राज्यातील विशेषत: दक्षिण भारतातील बँक व्यवस्थापकांची नियुक्ती करण्यात आल्याने त्यांना केवळ इंग्रजी आणि त्यांची मातृभाषा अवगत असते. त्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांशी मराठीतून प्रभावी संवाद साधताना अडचणी निर्माण होत आहेत. याचा परिणाम पीक कर्ज वाटप प्रक्रियेवर होत असून शेतकऱ्यांना वेळेवर कर्ज उपलब्ध होत नसल्याने त्यांचे नुकसान होत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील बँकांमध्ये स्थानिक भाषेची जाण असणारे व येथील संस्कृतीशी निगडीत असणारे महाराष्ट्र राज्यातीलच बँक अधिकारी दिले, तर एकंदरीत बँकिंग व्यवस्था उत्तम रितीने चालण्यास मदत होईल. विशेष म्हणजे शेतकऱ्यांना सहजरित्या अशा अधिकाऱ्यांशी आपल्या स्थानिक भाषेत संवाद साधून अडीअडचणी सांगता येईल. मराठी बँक अधिकाऱ्यांना, स्थानिक नागरिकांना कशाची गरज आहे, पीक कर्जाबाबत काय अडचणी आहेत, याची माहिती असते. त्यामुळे अशा मराठी अधिकाऱ्यांच्या नियुक्तीमुळे येथील बँकींग व्यवस्था अधिक प्रभावीपणे चालण्यास मदत होणार आहे, असे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारमन यांना लिहिलेल्या पत्रात नमुद केले आहे.



# प्रिय सरकारा, भुषण भारता : हा बेकारीचा रस्ता?

**भारतात सन १९८० ते सन १९९५ या काळात मोठ्या प्रमाणात बेकारी होती. परंतु मुक्त अर्थव्यवस्थेमुळे देशातला रोजगार निर्मितीचा प्रश्न बऱ्याच अंशी कमी झाला होता. मात्र सांप्रतकाळी तर त्याहून चिंताजनक स्थिती निर्माण झाली आहे. सन २०२४च्या निवडणूकीनंतर रोजगार उपलब्ध करून दिले जातील अशी युवकांना व जनतेला अपेक्षा होती, मात्र सारे स्वप्न धुळीस मिळाले. बेकारीची समस्या दिवसेंदिवस वाढतच आहे. जुन्या नोकरदारांना दोन–दोन, तीन–तीन अतिरिक्त प्रभार सांभाळताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. तरीही नोकर भरतीला ब्रेक लावलेले आहेत. सुशिक्षित बेरोजगार मिळेल ते काम करत आहेत. फक्त पोलिस भरती सुरू आहे. त्यात वकीली, डॉक्टरेट, अभियंता, अशा पदव्या मिळविलेले तरुण उतरत आहेत, थोडा थोडका जमिन तुकडा विकून उच्च शिक्षण घेतलेले तरुण हॉटेलमध्ये कपबश्या विसळण्याचे कामसुद्धा शोधत आहेत. गावातील गुरे, शेळ्या जंगालात नेऊन चारण्याचे काम करू लागले आहेत. सरकारी नोकरीच्या चार–पाच जागेसाठी लाखो तरुणांचे अर्ज जमत आहेत. त्यामुळे छुपी वशिलेबाजी फोफावत आहे. त्यातल्या त्यात अर्जाची शुल्कही गरीबांना आणखी खोल डोहात ढकलणारी असते. रु.९०० ते १००० एवढी मोठी रक्कम जमा करण्यात त्यांचे बरेच दिवस खर्ची पडलेले असतात. कारण कोठेही त्यांना दररोज १०० रुपयांची मोलमजुरी करावी लागत आहे. गडचिरोली सारख्या अतिदुर्गम जिल्ह्यात जल सिंचनाच्या सोयी नाहीत, त्यामुळे शेतकरी केवळ पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने शेती पिकली तर पिकली नाहीतर फेकली, अशी बिकट परिस्थिती. उद्योगधंदे, कारखाने, प्रकल्प आदी काहीच नाहीत. त्यामुळे रोजी, मजुरीचीही वाणवाच आहे. सामान्य जनता अन्नान दशेत आहे, जेथील युवकवर्ग सुशिक्षित बेकार– बेरोजगार आहे, तो देश विकसनशील देश आहे, असे कसे काय म्हणता येईल? बेकारीची समस्या मांडणारा श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरुजींचा हा लेख... संपादक.**

बेकार म्हणजे ज्याला काम मिळालेले नाही असा व्यक्ती होय, बेकारीचा अभ्यास करताना दोन बाबी आधी स्पष्ट झाल्या पाहिजेत, पहिली म्हणजे बेकारीची व्याख्या कार्यकारी लोकसंख्येपर्यंतच मर्यादीत ठेवावी लागते, लोकसंख्येतील ० ते १४ वयोगट व ज्येष्ठ नागरिक इ. घटक वजा केल्यावर जी उरते ती कार्यकारी लोकसंख्या होय. बेकारी म्हणजे अशी स्थिती होय, की जेथे व्यक्ती प्रचलित मजुरीच्या दरावर काम करायला तयार असतो, परंतु त्याला काम मिळत नसते. बेरोजगारीमुळे देशातील मानवी साधनसंपत्तीचा अपव्यय होतो. बेरोजगारीमुळे देशासमोरील अनेक समस्यांमध्ये वाढ होते. बेकारीमुळे देशातील सकल राष्ट्रीय उत्पन्न कमी राहते आणि समाज हा गरीब व मागासलेला राहतो. बेकारीमुळे देशाच्या अर्थव्यस्थेच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होतो.

बेकारीची संकल्पना: (१) अनैच्छिक बेकारी– या बेकारीला दृश्य किंवा उघड बेकारी असेही म्हणतात. ही बेकारी म्हणजे अशी एक अवस्था की लोकांची काम करण्याची पात्रता असते आणि काम करायला तयार असतात, परंतु त्यांना काम प्राप्त होत नाही. ही स्थिती श्रमांचा अतिरिक्त पुरवठा व त्या तुलनेत श्रमिकांची कमी मागणी यातून निर्माण होते. यामध्ये माणसांची मनस्थिती नसतानाही असेल ते कामे करावी लागतात तेही विनामोबदला किंवा कमी मोबदला; त्यामुळे त्यांचे हक्कांचे उच्छाटन होत असलेले दिसून येते. तसेच कमी मिळालेल्या मोबदल्याने त्यांच्या परिवारातील आर्थिक अडचणी पूर्ण होत नसल्याने बेकारींचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते. (२) ऐच्छिक बेकारी– हा बेकारीचा असा प्रकार आहे की जेथे व्यक्ती काम करण्यासाठी पात्र असते पण तिची काम करण्याची इच्छा नसते. खऱ्या अर्थाने ही बेकारीची स्थिती नसून निष्क्रियतेची स्थिती आहे. (३) न्यून किंवा अर्धबेकारी– ही एक अशी स्थिती होय, की जेथे व्यक्तीची काम करण्याची क्षमता पूर्णपणे वापरली जात नाही, किंवा तिला कनिष्ठ पातळीवर काम करावे लागते. उदा. १. पदव्युत्तर शिक्षित व्यक्तीने पहारेकऱ्याची नोकरी करणे. २.इंजिनिअर व्यक्तीने शिपायाची नोकरी करणे. (४) पूर्ण बेरोजगारी– व्यक्तीकडे पात्रता, कौशल्य, इच्छाशक्ती, असूनही कोणत्याच ठिकाणी काम प्राप्त होत नाही. याला पूर्ण बेरोजगारी म्हणतात

बेकारीचे प्रकार: १. ग्रामीण बेकारी– ही बेकारी प्रामुख्याने ग्रामीण भागात दिसून येते. ही एक गंभीर स्वरूपाची समस्या आहे. यामध्ये खालील प्रकार येतात. अ) हंगामी बेकारी– भारतात बहुतेक शेतकरी लागवडी साठी पावसावर अवलंबून असतात. त्यामुळे वर्षातून एकदाच पीक घेता येते. यामुळे ग्रामीण शेतमजुरांना केवळ ४ ते ५ महिनेच काम प्राप्त होते व उर्वरित काळ ते बेकार राहतात. म्हणून या प्रकाराला हंगामी बेकारी म्हणतात. ही बेकारी शहरी भागात सुद्धा आढळते. उदा. पर्यटन क्षेत्रातील मार्गदर्शक, लग्नसमारंभातील वादक इत्यादी. ब) प्रच्छन्न बेकारी (छुपी): अति लोकसंख्येच्या अविकसित आणि विकसनशील देशांमध्ये प्रच्छन्न बेकारी ही एक मूलभूत स्वरूपाची समस्या आहे. या प्रकारच्या बेकारीत ज्या ठिकाणी काम करण्यासाठी कमी लोकांची गरज आहे, तिथे गरजेपेक्षा जास्त लोक काम करतात, तेव्हा अतिरिक्त श्रमिकांची सीमान्त उत्पादकता शून्य राहते. म्हणजेच अतिरिक्त लोक उत्पादनात कोणतीही भर टाकत नाही व छुपी बेकारी निर्माण होते. उदा. एका कारखान्यात उत्पादन प्रकियेसाठी केवळ २० कामगारांची गरज असताना तेथे २५ कामगारांनी काम करणे. येथे अतिरिक्त ५ कामगार हे छुपे बेकार ठरतील व ते उत्पादनात कोणतीही भर टाकत नाही. अशा अतिरिक्त कामगारांनी उत्पन्नाचे मूल्य विनाकारण वाढते. क) शहरी बेकारी: जी बेकारी शहरी भागांमध्ये आढळून येते तिला शहरी बेकारी म्हणतात. याचे खालील प्रकार आहेत. सुशिक्षित बेकारी– ज्या व्यक्तीने शिक्षण घेतले आहे आणि त्याची काम करण्याची इच्छा व पात्रता असूनही काम मिळत नसेल, अशा स्थितीला सुशिक्षित बेकारी असे म्हणतात. ही बेकारी दहावी, बारावी पास झालेले, पदवीपूर्व, पदवीधर, पदव्युत्तर शिक्षण घेतलेले या लोकांमध्ये आढळून येते. नोकरीयोग्य शिक्षणासाठी जास्त पैसे मोजावे लागतात. अनेकांच्या आर्थिक परिस्थितीमुळे व उच्च शिक्षणासाठी आकारण्यात येणाऱ्या भरमसाठ शुल्कामुळे योग्य शिक्षण घेणे शक्य होत नाही. म्हणूनही बेकारी वाढते. शिक्षण घेणारे दिवसेंदिवस



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष– ७१३२७९६६८३.

वाढत असले तरी त्यांच्या शिक्षणासारखे त्यांना काम मिळत नाही. उच्च पदवी घेऊन देखील आज लाखो सुशिक्षित बेकारांचे प्रमाण वाढले आहे. सरकार कोणतेही असो पण त्या सुशिक्षितांना त्यांच्या पदवी अनुसार काम मिळाले पाहिजे, नाहीतर ही बेकारी भविष्यात खूप वाढेल व त्यांना पाहून येणारी पुढची पिढी ही शिक्षणापासून वंचित राहील, असा विचारही दिसून येतो. तांत्रिक बेकारी– उत्पादनाच्या तंत्रात बदल झाल्याने जी बेकारी निर्माण होते, त्या बेकारीला तांत्रिक बेकारी असे म्हणतात. शहरी भागात कारखानदार श्रमिकांऐवजी यंत्रांना जास्त प्राधान्य देतात. त्यामुळे उत्पादन खर्च कमी होतो आणि नफा वाढतो. उच्च दर्जाचे तंत्रज्ञान वापरून उत्पादन करणे, यामुळे श्रमिकांना कामावरून कमी केले जाते. त्यामुळे तांत्रिक बेकारी निर्माण होते. घर्षणात्मक बेकारी (संघर्षात्मक बेकारी )– या प्रकारच्या बेकारीमध्ये आर्थिक संघर्षामुळे श्रमिकांना तात्पुरत्या स्वरूपात बेकार व्हावे लागते. यंत्रातील बिघाड, कच्च्या मालाची टंचाई, वीज कपात इ. मुळे श्रमिकांना कामावरून कमी केले जाते. अशा स्थितीत श्रमिकांना एक काम सोडल्यापासून दुसरे काम स्वीकारेपर्यंत बेकार राहावे लागते, म्हणून त्याला घर्षणात्मक बेकारी म्हणतात. कारण या बेकारीच्या मधल्या काळात त्यांनी परिस्थितीशी संघर्ष केलेला असतो. ड) चक्रीय बेकारी– तेजीच्या अवस्थेनंतर येणाऱ्या मंदीच्या अवस्थेत प्रभावी मागणीच्या कमतरतेमुळे निर्माण होणाऱ्या बेकारीला चक्रीय बेकारी म्हणतात. हा बेकारीचा प्रकार व्यापार चक्रामुळे निर्माण होतो. मंदीच्या काळात प्रभावी मागणीच्या कमतरतेमुळे आर्थिक क्रिया मंदावतात त्यामुळे उद्योगांचे मालक उत्पादन कमी करतात. परिणामी कामगारांना कामावरून कमी केले जाते. उदा. २००८च्या मंदीमुळे माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात अशाच प्रकारची चक्रीय बेकारी निर्माण झाली होती. ई) संरचनात्मक बेकारी– जेव्हा अर्थव्यवस्थेत संरचनात्मक व तंत्रज्ञानात्मक बदल होतात तेव्हा ही बेकारी निर्माण होते. जेव्हा मागासलेल्या व परंपरागत अर्थव्यवस्थेत संरचनात्मक बदल होऊन ती आधुनिक व विकसित होत जाते तेव्हा मागणीमध्ये मूलभूत स्वरूपाचे बदल होतात. त्यातून संरचनात्मक बेकारी निर्माण होते. ही बेकारी एक दीर्घकालीन घटना होय. उदा. ऑटो रिक्षांमुळे शहरातील घोडागाडी कालबाह्य झाली म्हणजेच त्यांना संरचनात्मक बेकारी सहन करावी लागली.

भारतातील बेकारीची परिस्थिती (सद्यस्थिती): भारतात ग्रामीण व शहरी भागात मोठ्या प्रमाणावर कामगारांना इच्छेविरुद्ध बेकार राहावे लागते, हे निर्विवाद सत्य आहे. नेमके किती लोक बेकार आहेत, त्याचा अंदाज घेणे कठीण आहे. नियोजन मंडळ, जनगणनेचा अहवाल, तसेच मध्यवर्ती सांख्यिकी संस्था यांना या बाबतीत अचूक माहिती नाही. या बाबतीत काही अंदाज पुढीलप्रमाणे देता येतील– शहरी व ग्रामीण भागातील बेरोजगारी–

बेकारीची कारणे: १.लोकसंख्या वाढीची जास्त गती– स्वातंत्र्यानंतर भारताची लोकसंख्या वेगाने वाढू लागली. त्यामुळे श्रमशक्ती वाढत गेली. अपुऱ्या आर्थिक विकासामुळे या अतिरिक्त श्रमशक्तीला द्वितीय व तृतीय क्षेत्रात सामावून घेता आले नाही. त्यामुळेच बेकारी वेगाने वाढत गेली. शेती मशागतीचे मागास स्वरूप– अज्ञान व निरक्षरतेमुळे भारतातील शेतकरी शेतीमध्ये परंपरागत पद्धतीचा वापर करतात. त्यामुळे भूमीची उत्पादकता कमी राहते आणि रोजगार वाढत नाही. सरकारी नोकर भरती बंद– यामुळे सुशिक्षित बेरोजगारी शिगेला गेली. सरकारच्या नोकर कपात मोहिमेद्वारे सुद्धा बेकारीत अवाढव्य वृद्धी होते, परिणामतः बेकारी वाढते.

भारतात सन १९८० ते सन १९९५ या काळात मोठ्या प्रमाणात बेकारी होती. परंतु मुक्त अर्थव्यवस्थेमुळे देशातला रोजगार निर्मितीचा प्रश्न बऱ्याच अंशी कमी झाला होता. मात्र सांप्रतकाळी तर त्याहून चिंताजनक स्थिती निर्माण झाली आहे. बेकारीची समस्या दिवसेंदिवस वाढतच आहे. जुन्या नोकरदारांना दोन–दोन, तीन–तीन अतिरिक्त प्रभार सांभाळताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. तरीही नोकर भरतीला ब्रेक लावलेले आहेत. सुशिक्षित बेरोजगार मिळेल ते काम करत आहेत. फक्त पोलिस भरती सुरू आहे. त्यात वकीली, डॉक्टरेट, अभियंता, अशा पदव्या मिळविलेले तरुण उतरत आहेत, थोडा थोडका जमिन तुकडा विकून उच्च शिक्षण घेतलेले तरुण हॉटेलमध्ये कपबश्या विसळण्याचे कामसुद्धा शोधत आहेत. गावातील गुरे, शेळ्या जंगालात नेऊन चारण्याचे काम करू लागले आहेत. सरकारी नोकरीच्या चार–पाच जागेसाठी लाखो तरुणांचे अर्ज जमत आहेत. त्यामुळे छुपी वशिलेबाजी फोफावत आहे. त्यातल्या त्यात अर्जाची शुल्कही गरीबांना आणखी खोल डोहात ढकलणारी असते. रु.९०० ते १००० एवढी मोठी रक्कम जमा करण्यात त्यांचे बरेच दिवस खर्ची पडलेले असतात. कारण कोठेही त्यांना दररोज १०० रुपयांची मोलमजुरी करावी लागत आहे. आज सन २०२४नंतरही विज्ञानयुगात गडचिरोली सारख्या अतिदुर्गम जिल्ह्यात जल सिंचनाच्या सोयी नाहीत, त्यामुळे शेतकरी केवळ पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने शेती पिकली तर पिकली नाहीतर नासली, अशी बिकट परिस्थिती आवासून आहे. उद्योगधंदे, कारखाने, प्रकल्प आदी काहीच नाहीत. त्यामुळे रोजी, मजुरीचीही वाणवाच आहे. सामान्य जनता अन्नान दशेत आहे, जेथील युवकवर्ग सुशिक्षित बेकार– बेरोजगार आहे, तो देश विकसनशील देश आहे, असे कसे काय म्हणता येईल? !! बेकारी– बेरोजगारी सहन करण्यास भाग पाडणाऱ्या संवेदनशून्य सरकारचा जाहीर निषेध !!

## तर शेतकरी सरकारचा कडेलोट करतील–शंकर गायकवाड

**बार्शी (सोलापूर) । प्रतिनिधी**

वारंवार शांततेच्या मार्गाने आंदोलने करून सुद्धा सरकार झोपेचं सोंग घेऊन जर शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण करणार नसेल तर मात्र शेतकरी सरकारचा पराभवाच्या खाईत कडेलोट केल्याशिवाय गप्प बसणार नाहीत असा खणखणीत इशारा आमच्या प्रतिनिधीशी बोलताना शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष शंकर गायकवाड यांनी बार्शी तहसील समोर झालेल्या आंदोलनाप्रसंगी दिला.



त्यावेळी शेतकरी संघटनेचे युवा तालुका अध्यक्ष शरद भालेकर, लोकप्रतिष्ठा विचारमंचचे अध्यक्ष राहुल भड, संभाजी ब्रिगेडचे आनंद काशीद, अशोकराव माळी, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे रामराव काटे, मनोज जरांगे पाटील संघटनेचे विनायक घोडके, जनहित शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष रवींद्र मुठाळ, रयत क्रांती संघटनेचे रामहरी पेजगुडे आदींनीही मनोगत व्यक्त केले. त्यावेळी समाधान पाटील, अभिजीत शिंदे, संजय कोंढारे, राजेंद्र पाटील, तुकाराम सातपुते, अनिल गावसाने, अभिषेक पाटील, अक्षय पाचकवडे, काशिनाथ उमाटे आदींसह बहुसंख्य शेतकरी सहभागी झाले होते.सन २०२३ खरीप व रब्बीचा राहिलेला पिकविमा द्या, येलोमोजाईक व दुष्काळाची उर्वरित नुकसान भरपाई द्या, मागील थकीत कांदा अनुदान व थकित ऊसबिले तात्काळ अदा करा आदी मागण्यासाठी हे आंदोलन विविध संघटनांच्या वतीने करण्यात आले.बार्शीचे तहसीलदार एफ.आर. शेख यांनी सायंकाळी पाच वाजता आंदोलकांना लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले, तर या आंदोलनाचा चोख पोलीस बंदोबस्त बार्शी शहर पोलीस स्टेशनच्या वतीने ठेवण्यात आलेला होता.

## शारदा नागापुरे यांच्या वाढदिवसा निमित्त परसोडा येथे वृक्षारोपन





**वरोरा । प्रतिनिधी**

भारतीय जिवन विमा निगम शाखा वरोरा अतर्गत वरिष्ठ विमा अभिकर्ता म्हणून काम करत असलेल्या शारदाल प्रमोद नागापुरे एम डी आर टी (युएसए) यांनी त्याच्या वाढदिवसानिम्मित ग्रामपंचायत परसोडा येथिल परीसरात वृक्ष लागवडी करीता गुलमोहर, रिठा, करंजी, अशोका, बेल, कडुनिंब इत्यादी विविध जातीचे झाडे देऊन वृक्षारोपन केले.या वृक्षारोपन कार्यक्रमाकरीता रमेश पावडे, उपसरपंच ग्राम पंचायत परसोडा वैशाली कुरेकार पोलीस पाटील परसोडा , रामाजी चवले सामाजिक कार्यकर्त परसोडा,माधुरी डाखोरे, गंगुबाई परचाके, सोनुताई गेडाम, निर्मला जोगी, समीर कुरेकार, नथ्थुजी गारघाडे, धनराज रामटेके यांनी ग्राम पंचायत परीसरात वृक्षलागवडी साठी सहकार्य केले.वृक्षलागवडी कार्यक्रम झाल्यानंतर येथिल ग्राम पंचायत परीसरात खेळत असणाऱ्या लहान मुलांना बिस्कीट वाटप करण्यात आले.

## गिरसावळी सेवा सहकारी संस्थेवर परिवर्तन विकास पॅनलचा झेंडा

### १२ पैकी १२ उमेदवार विजयी, शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांचे नेतृत्व

**वरोरा । प्रतिनिधी**





तालुक्यातील गिरसावळी सेवा सहकारी संस्था मर्या निवडणूक २०२४ नुकतीच संपन्न झाली.या निवडणुकीत परिवर्तन विकास पॅनलने वर्चस्व निर्माण केले आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाचे जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वात लढविण्यात आलेल्या या निवडणुकीत १२ पैकी १२ उमेदवार दणदणीत विजयी झाले आहे.या विजयी उमेदवारांचा सत्कार शिवसेना जिल्हा कार्यालय जिल्हाप्रमुख जिवतोडे यांच्या हस्ते करण्यात आला. तालुक्यातील गिरसावळी येथील सेवा सहकारी संस्थेची निवडणूक नुकतीच संपन्न झाली. या निवडणुकीसाठी दिनांक २३ जून रोजी मतदान पार पडले. या निवडणुकीमध्ये सेवा सहकार पॅनल व परिवर्तन विकास पॅनल यांच्यामध्ये थेट लढत झाली. यामध्ये शिवसेना प्रणित परिवर्तन विकास पॅनलच्या १२ पैकी १२ उमेदवारांनी मोठ्या मताधिक्याने विजय संपादित करत एकहाती वर्चस्व प्रस्थापित केले. यामध्ये सर्वसाधारण गटातून प्रभाकर किसन आत्राम,मारोती फकरू आत्राम,खुशाल रामाजी कुडमेथे,मनोज गहूदास गाडगे,मधुकर निळकंठ घोडमारे,ज्ञानेश्वर नामदेव घोडमारे,राहुल नामदेव नागपुरे व अनिल दादाजी पिजदूरकर हे विजयी झाले तर इतर मागासवर्गीय गटातून अशोक सोनबा पिजदूरकर व अनुसूचित जमाती गटातून देविदास डोमा आत्राम आणि महिला राखीव गटातून चंद्रकला हनुमान अहिरकर व पार्वताबाई माधव गिरसावळे हे विजयी झाले आहे.या सर्व उमेदवारांचा सत्कार शिवसेना ( उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या जिल्हासंपर्क कार्यालयात जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या हस्ते करण्यात आला.याप्रसंगी त्यांना मिठाई भरवून अभिनंदन करण्यात आले.यावेळी उपजिल्हा प्रमुख अमित निब्रड, विधानसभा समन्वयक सुधाकर मिलमिले, मा.उपजिल्हा प्रमुख वसंता मानकर,ज्येष्ठ शिवसैनिक तथा शिवदूत बंडूजी डाखरे,आदिवासी नेते रमेश मेश्राम,शाखा प्रमुख मनोज गाडगे व आदी पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

## महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक समिती द्वारा सत्कार गुणीजनांचा समारंभ थाटात संपन्न



**मूल । प्रतिनिधी**

महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक समिती जिल्हा चंद्रपूर ची जिल्हा कार्यकारिणी सभा जिल्हाध्यक्ष किशोर आनंदवार यांचे अध्यक्षतेखाली नुकतीच संपन्न झाली. सभेत एकुण ११ विषयांवर सविस्तर चर्चा करुन ठराव पारित करण्यात आले.जिल्हा सभेत औचित्य साधून महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक समिती चे शिलेदार पदोन्नती व सरळसेवा भरती ने शिक्षण विस्तार अधिकारी व केन्द्र प्रमुख पदावर पदस्थापीत झाल्याने त्यांच्या अथक प्रयत्नांची फलश्रुतीचा गौरव व सन्मान व्हावा यासाठी सत्कार गुणीजनांचा समारंभ आयोजित केलेला होता. सत्कार समारंभात पदोन्नती ने शिक्षण विस्तार अधिकारी तथा प्रभारी गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती सावली येथे कार्यरत असलेले मोरेश्वर बोंडे यांचा शाल, सन्मानचिन्ह पुष्पगुच्छाने सम्मानित करण्यात आले. तसेच सरळसेवा भरती ने शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून नियुक्त झालेले संदिप चौधरी,देवानंद रामगिरकर,श्वेता लांडे,विशाल बोधाने यांना शाल सन्मानचिन्ह पुष्पगुच्छाने गौरविण्यात आले. पदोन्नतीने शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून पदस्थापना झालेले कल्पना सिद्धमशेट्टीवार यांना शाल सन्मानचिन्ह पुष्पगुच्छाने सम्मानित करण्यात आले. केन्द्र प्रमुख पदावर पदोन्नतीने पदस्थापीत झालेले सुनिल कोहपरे,अशोक दहेलकर,शंकर धाबेकर, किशोर येनगंटीवार, जगन्नाथ वाढई,कल्पना श्रीकुंडावार,माधुरी देवगडे,अशोक राऊत यांना शाल सन्मानचिन्ह देवून सम्मानित करण्यात आले. कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून पुरोगामी शिक्षक संघटनेचे राज्य नेते विजय भोगेकर, राज्याध्यक्षा डॉ.अल्का ठाकरे, सुनिता इटनकर, गंगाधर बोढे,गणपत विधाते, रजनी मोरे,वैशाली वडेट्टीवार,सुभाष अडवे,जीवन भोयर,मनिषा मडावी, संदिप कोंडेकर, पुरुषोत्तम टोगे,लक्ष्मण खोब्रागडे, तसेच सर्व तालुकाध्यक्ष व पुरोगामी शिक्षक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सुरेश गिलोरकर यांनी केले. आभार दिवाकर वाघे मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विलास मोरे,देवेंद्र गिरडकर,दिवाकर वाघे,अशोक दहेलकर, झाडे,सुरेश गिलोरकर यांनी अथक परिश्रम घेतले.

## जायकवाडी धरणावर पाच ते सहा ड्रोनने टेहळणी

**पैठण**–जायकवाडी धरणावर पाच ते सहा ड्रोनने टेहळणी केल्याचा प्रकार समोर आला आहे. मंगळवारी रात्री १० वाजुन ४५ मिनिटाने धरणावर पाच ते सहा ड्रोनच्या माध्यमातून अज्ञाताने टेहाळणी केल्याची माहिती आहे. यामुळे आता धरणाच्या धरणाच्या सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्न निर्माण झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, धरणाचे शाखा अभियंता विजय काकडे यांनी सांगितले कि, मंगळवारी रात्रीच्या दरम्यान पाच ते सहा ड्रोनच्या माध्यमातून संपूर्ण धरणाची टेहळणी करण्यात आली. या संदर्भात पोलिसांना कळविण्यात आले. मात्र तोपर्यंत ड्रोन धरणाच्या अतिल भागातील बेटावर दिसल्याचे काकडे यांनी सांगितले.

# बहिण भावाच्या नात्याला लागले हिस्से वाटणीने ग्रहण

**सुमित हेपट । यवतमाळ**

परिपूर्ण स्नेहाणे भरलेले नाते म्हणजे बहीण भावाचे नाते होय. परंतु काळाच्या ओघात पैसा, भांडवल याला महत्त्व आले आहेत तसेच वडिलोपार्जित संपत्तीत कायद्याने आता बहिणीला समान भागीदार बनविले आहेत त्यामुळे संपत्तीत भागीदार बनत आहे. समाजात ह्या बाबी मान्य नसल्याने मान सन्मान यात बदल पाहायला मिळत आहे. समाजात वडिलांनी लग्न लावून दिल्यानंतर माहेर हे मुलीकरीता हक्काचे व्यासपीठ असते. कालांतराने या सर्व जबाबदाऱ्या भावाकडे असतात. सुख आणि दुःख किंवा संकटात ऊर्जास्रोत म्हणून भाऊ असतो. बहिणीचे लाड पुरविण्यात कुठेही भाऊ कमी पडत नसतो. परंतु वडिलोपार्जित संपत्तीत हिस्सा घेतल्याने या नात्यात अनेक ठिकाणी दुरावा निर्माण झाल्याचे पहावयास मिळत आहे. एवढेच नाही तर बहिणीच्या अपत्याची लग्न कार्यात मामाला विशेष स्थान असते. विवाहाच्या मांगलीक कार्यात मामाला उभे केले जाते. बहिणीने घेतलेल्या संपत्तीत हिस्सा यामुळे बहीण भावाचे नाते दुरावल्या जात आहे.

या सर्व प्रसंगाणा तोंड देत यातून तयार झाला माणस मामा म्हणजे मानलेला मामा. सख्या नात्यावर नामुष्की ओढून हा माणस मामा लग्न प्रसंगात या वर्षी अनेक ठिकाणी पहावयास मिळाला. बहीण भावाचे नाते विरळ होत आहेत ते केवळ संपत्तीत भागीदार झाल्याने. बहिणीने घेतलेला हिस्सा समाज मान्य नसल्याने नातेवाईकांमध्ये आणि समाजात प्रतिमेला धक्का बसतो. पैसा आणि संपत्तीच्या लोभात आयुष्यभराकरिता भावा-बहिणीच्या नात्याला विराम बसतो. कुठल्याही नात्याशिवाय आयुष्याला महत्त्व उरत नाही. संपत्तीचा वाद कधी कोर्ट कचेरीच्या पायऱ्या चढतानां दिसतात यात एकमेकांचे बहीण भाऊ वैरी झाल्याच्या घटना दिवसागणिक वाढत आहे. धन संपत्तीला फार मोठे महत्त्व आले आहे. त्यामुळे भावासोबत वैर घ्यायला आता बहिणीची माघार नसणार हे मात्र निश्चित झाले आहे. माहेरचा गोडवा आता विरळ होत चालला आहे. रक्षबंधन, दीपउत्सवातील भाऊबीज आणि उन्हाळात आंब्याच्या रसाचा पाऊणचार. एकाच ठिकाणी घालविलेले बालपण, आईवडील, काका काकू यांच्या संस्काराची बीजे तेव्हा स्मरणात येत नसावी का. हे सुद्धा न उलगडणार कोडच आहे. नात्याची वीण एकाणे उसवली तरी दुसऱ्याने घट्ट धरून ठेवली तरच नाती टिकू शकतात. वडील किंवा मुलगी हयात असो किंवा नसो मुलीचा वडिलांच्या संपत्तीवर समान हक्क आहे असे सर्वोच न्यायालयाने ११ ऑगस्ट २०२०रोजी पुन्हा एकदा स्पष्ट केले. परंतु नाते कायम रहावे हा मोठा दृष्टीकोन अनेक बहिणींनी ठेऊन हक्क सोड केल्याने नाते टिकून राहण्याला तीन ते चार पिढ्या झाल्यानंतरही तेच नाते पुढे व्यवस्थित दिसत आहे. नव्या पिढ्याना मार्गदर्शक ठरत असतांना काहींनी कायद्याची आणि हक्काची बाजु असल्याचे सांगत वडिलोपार्जित संपत्तीत हिस्सा घेत आहेत.



# आणीबाणीचे समर्थकच लोकशाहीचे खरे मारेकरी-आ.किर्तीकुमार भांगडीया

### क्रांतीलढ्याचे साक्षीदार असलेल्या चिमुरात आणीबाणी काळादिवसाचे स्मरण




**चिमुर । प्रतिनिधी**

माजी पंतप्रधान स्व. इंदिरा गांधीजींनी १९७५ मध्ये देशावर आणीबाणी लादून लोकशाहीचा गळा घोटला. आणीबाणीत अनेक राष्ट्रभक्त, विचारवंत, पत्रकार, शिक्षणतज्ञ, कलाकार, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील महान विभुती, महिला, पुरूष व हजारो आंदोलनकारी युवकांना कारागृहाच्या कालकोठडीत डांबून देशावर हुकूमशाही लादण्याचे पाप केले. आज हा दिवस संपुर्ण देश 'काळा दिवस' साजरा करीत आहे असे प्रतिपादन चिमुरचे आ. किर्तीकुमार भांगडीया यांनी केले.

आ. भांगडीया यांच्या चिमुर येथील नवीन जनसंपर्क कार्यालयात दि. २५ जून रोजी लोकतंत्र सेनानींच्या सत्कार प्रसंगी आ. भांगडीया बोलत होते. ते म्हणाले की, जे आज आणीबाणीचे समर्थक व हुकूमशाही विचाराचा वारसा सांगणारे, संविधान बदलणार म्हणून गळा काढून ओरडत आहेत. तेच लोक लोकशाहीचे खरे मारेकरी आहेत याचा देशवासीयांनी अंतर्मुख होवून विचार करावा असेही ते म्हणाले. यावेळी आ. भांगडीयांनी उपस्थित सर्व आणीबाणी विरोधी संघर्ष नायकांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून यथोचित सन्मान केला.या कार्यक्रमात आणीबाणी काळात मिसाबंदी व सत्याग्रह करणाऱ्या संघर्ष नायकांनी तसेच दिवंगत लोकतंत्र सेनानींच्या परिवारातील सदस्यांची मोठ्या संख्येत उपस्थिती लाभली होती. या कार्यक्रमास उपस्थितांना लोकतंत्र सेनानी संघटनेचे जिल्हाध्यक्ष मनोहर सहारे, गिरीष अणे, बाबासाहेब भागडे, श्री. व सौ. सुमनताई पिंपळापुरे आदिंनी संबोधित केले. याप्रसंगी दिलीप शिनखेडे, सालोटकर, भुसारी, अनिल अंदनकर, मोरेश्वर ठिकरे, नेवासकर आदिंची उपस्थिती होती. लोकतंत्र सेनानींनी या काळ्या दिवसानिमित्त आणीबाणीचा जाहीर निषेध केला. संघटनेच्या वतिने आ. भांगडीया यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर केले.

# जिल्हास्तरीय तपासणी समितीद्वारे जिल्ह्यातील बालगृहांना भेट

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महिला व बालविकास विभागाच्या जिल्हास्तरीय तपासणी समितीने शासकीय मुलांचे बालगृह / निरीक्षणगृह, शासकीय मुलींचे बालगृह/ निरीक्षणगृह आणि महिला विकास मंडळ द्वारा संचलित किलबिल प्राथमिक बालगृह दत्तक योजना येथे भेट दिली.

जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय अंतर्गत वरील तिनही बालगृह चालविल जात असून उपविभागीय अधिकारी संजय पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हास्तरीय तपासणी समितीद्वारे सदर तपासणी करण्यात आली. यावेळी बालकांना मिळणाऱ्या सोयी सुविधा, आरोग्य विषयक काळजी, स्वच्छता, जेवणाची सुविधा व गुणवत्ता, समुपदेशन सेवा, दैनंदिन लागणाऱ्या वस्तु आदी विषयी संस्थेच्या पदाधिका-यांसोबत चर्चा करून माहिती घेण्यात आली. याव्यतिरिक्त काही मदत लागल्यास किंवा काही अडचण असल्यास जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय चंद्रपूर, येथे माहिती देण्यास सांगितले.

जिल्हास्तरीय तपासणी समितीने जास्तीतजास्त नागरिकांपर्यंत बालगृह विषयी माहिती पोहचवणे व जनजागृती करणे बाबत सुचना दिल्या.यावेळी उपविभागीय अधिकारी संजय पवार, नायब तहसिलदार प्रियंका मानकर, बालकल्याण समितीच्या अध्यक्षा डॉ क्षमा बासरकर, मनोविकृती तज्ज्ञ संदीप भटकर, मानसोपचार तज्ज्ञ प्रियंका मून, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अजय साखरकर, शशिकांत मोकाशे, दिवाकर महाकाळकर, प्रभावती मुठाळ, नंदा अल्लूरवार, निलेश जक्कुलवार, हेमंत कोठारे, अभिषेक मोहूर्ले आदी उपस्थित होते.

# कृषीदुतांनी दिले शेतकऱ्यांना चारा उपचाराचे प्रात्यक्षिक

**वरोरा । प्रतिनिधी**

डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठ , अकोला अंतर्गत महारोगी सेवा समिती द्वारा संचालित आनंद नि केतन कृषी महाविद्यालय,वरोरा येथील कृषीदुतांकडून गावातील शेतकऱ्यांना चारा उपचाराचे प्रशिक्षणात त्याची तयार करण्याची पद्धत तसेच त्याचे फायदे व निघडित सर्व माहीत देण्यात आली.युरिया प्रक्रिया केलेल्या चाऱ्यामध्ये प्रथिनांचे प्रमाण १-१.५ टक्क्यापासून ३-४ टक्क्यापर्यंत वाढते आणि पचनीय क्षमता २०-३० टक्क्यांनी वाढते.

चाऱ्याच्या पोषक घटकांमध्ये वाढ होते, त्यामुळे जनावरांच्या दूध उत्पादनातदेखील वाढ होते.जनावराची शारीरिक वाढ, प्रजनन क्षमता ही सुरळीत राखली जाते.अगदी कमी खर्चात व कमी वेळात जनावरांना पौष्टिक, सकस आहार उपलब्ध करून देता येतो.युरियाच्या वापरातून चारा पिकावर उपचार करण्याच्या प्रात्यक्षिकात एक लिटर पाण्यात ५०० ग्रा. गूळ, ५० ग्रा. मीठ व ९ ग्रा. युरिया एकजीव करून एक किलो वाळलेला चारा वर शिंपडून त्याचे मिश्रण केले आणि हा चारा २१ दिवसांनी गुरांना खायला देण्याचा सल्ला कृषी विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांना दिला. यावेळी पाचगाव येथील शेतकरी उपस्थित होते. प्रात्यक्षिकासाठी त्यांना कृषी महाविद्यालय वरोरा येथील समन्वयककृषी महाविदयालयाचे प्राचार्य,डॉ. एस. पोतदार ,कार्यक्रम प्रभारी डॉ. आर.व्ही. महाजन , कार्यक्रम समन्वयक डॉ. आर. तायडे तसेच कार्यक्रम प्रभारी डॉ. मुकुंद पाटोंड , डॉ. सुबोध गाजरलवार यांच्या मार्गदर्शनाखाली चतुर्थ वर्षातील कृषीदुतांमध्ये प्रतिक मेश्राम ,कार्तिक मिसाळ, अथर्व इंगळे,विशाल उपरे ,प्राजक्त पुडके ,अखिल जिवने, धनंजय राणे यांचा समावेश आहे.




# हिंगणघाट विधानसभा क्षेत्रातील वाघोली गावातील असंख्य कार्यकर्त्यांनी केला भाजपात प्रवेश

### आ. समिर कुणावार यांचे प्रमुख उपस्थितीत स्वीकारला भाजपाचा शेला

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

हिंगणघाट विधानसभा क्षेत्रात दिवसेंदिवस भाजपाचा मोठया प्रमाणात विस्तार होत असून विधानसभा क्षेत्रातील नागरीक, युवा कार्यकर्ते आ.समिर कुणावार यांचे नेतृत्वावर विश्वास व्यक्त करीत मोठया प्रमाणात भारतीय जनता पक्षात प्रवेश करीत आहेत.

दि. २५ जून रोजी हिंगणघाट विधानसभा क्षेत्रातील वाघोली येथील असंख्य पुरुष कार्यकर्त्यांनी आ. समीर कुणावार यांचा विधानसभा क्षेत्रातील लोकाभिमुख विकास तसेच कार्यसम्राट आमदार समीर कुणावार यांची कार्यशैली पहाता मोठ्या संख्येने भाजपात प्रवेश केला.सदर प्रवेश सोहळ्याचे आयोजन दि. २५ जून २०२४ रोजी आ. समीर कुणावार यांच्या स्थानिक जनसंपर्क कार्यालयात करण्यात आले.याप्रसंगी प्रामुख्याने संदीप भट, अभय अवचट, विनोद महाकाळकर , रामकरण झाडे, संजय येनोरकर, शंकर तळवेकर, सुनील येनोरकर, मंगेश ढगे, मनोहर डेंगळे, साहेबराव येनोरकर, प्रवीण ढगे, समीर येनोरकर , रवी येनोरकर , मंगेश गहूकर , सचिन महाकाळकर, रोशन खोडनकर , सतीश वरभे, सचिन मुंडे, हर्षल महाकाळकर, गजानन पर्बत, मनोहर अवचट, अनिल नौवकरकर , जिगर वाटमोडे, बालू तळवेकर, संजय बेले, राजू गहूकर, मनोहर अवचट ईत्यादी कार्यकर्त्यांना भाजपात रितसर प्रवेश देण्यात आला. उपरोक्त कार्यक्रम आमदार समीर कुणावार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.सदर कार्यक्रमाचे वेळी आ.समीर कुणावार यांचेसह जिल्हा महामंत्री भाजपा आकाश पोहाणे, भाजपा शहर अध्यक्ष भूषण पिसे, भाजपा शहर कार्यकारी अध्यक्ष संजय माडे, अमोल त्रिपाठी, प्रमोद नौकरकर, कमलाकर महाकाळकर, विजय तळवेकर, राजू गहूकर, राहुल माहुरे, संदीप भट इत्यादी भाजपा पदाधिकारी तसेच जेष्ठ कार्यकर्ते उपरोक्त पक्षप्रवेश सोहळ्यास उपस्थित होते.




# लग्नापुर्वी सिकलसेल तपासणी अनिवार्य-डॉ.महादेव चिंचोळे

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राष्ट्रीय आरोग्य अभियान, सिकलसेल आजार नियंत्रण कार्यक्रमांतर्गत सिकलसेल आजार नियंत्रण दिन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आला. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे डॉ. अशोक उईके, प्रभारी अधिष्ठता डॉ. भास्कर सोनारकर, डॉ. पोटदुखे, डॉ. संदिप भटकर उपस्थित होते.

सिकलसेल आजाराविषयी गैरसमज दूर करण्यासाठी तपासणी करून घ्यावी. या आजाराच्या नियंत्रणाकरीता प्रत्येक लग्न कुंडली सोबतच सिकलसेल आजाराची तपासणी करूनच लग्न करावे. लग्नापुर्वी तसेच गर्भवती महिलांनी एकदा तरी सिकलसेल तपासणी करून घेणे गरजेचे आहे. वाहक, वाहक व्यक्ती तसेच वाहकग्रस्त व्यक्तीमध्ये लग्न करू नये. असे लग्न झाल्यास येणारे मुल सिकलसेल ग्रस्त असू शकते. अशावेळी गर्भवती मातांनी तीन महिन्याच्या आत गर्भजल परीक्षण करून प्रसुतीबाबत निर्णय घ्यावा. यामुळे पुढील पिढीत हा आजार टाळता येतो, असे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे यांनी सांगितले.

डॉ. सोनारकर म्हणाले, सिकलसेल रुग्णांमध्ये वेळोवेळी हातपाय दुखणे, चक्कर येणे, नेहमी आजारी पडणे, जंतुसंसर्ग होणे अशी लक्षणे दिसून येतात. त्यामुळे या आजाराच्या रुग्णाने भरपूर पाणी पिणे, भरपूर आहार घेणे, रुग्णांनी नियमित फोलिक सिड व हॉयड्राक्सीयुरीया गोळयांचे सेवन करणे महत्वाचे असते. यामुळे रुग्णास होणाऱ्या वेदना कमी होतात. अशा रुग्णांनी वेळोवेळी डॉक्टरांच्या सल्ल्याने नियमित औषधोपचार, आरोग्य तपासणी करणे व काळजी घेणे गरजेचे असते. सन २०४७ नंतर सिकलसेल आजारग्रस्त मुल जन्माला येणार नाही. याकरीता जिल्हास्तरावर संकल्प फाउंडेशन मार्फत मोफत गर्भजल परीक्षण करण्यात येत आहे. तसेच जिल्हयात सर्व १ ते ४० वर्ष वयोगटातील सर्व व्यक्तींची तपासणी करण्यात येत असल्याचे डॉ. भास्कर सोनारकर यांनी सांगितले.

सिकलसेल आजार नियंत्रण कार्यक्रमांतर्गत सर्व गावात जनजागृती करुन सर्वच शासकीय आरोग्य संस्थेत मोफत सिकलसेल चाचणी करण्यात येत आहे. याकरीता प्रत्येक व्यक्तींनी आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांची मोफत सिकलसेल तपासणी करून आपण सिकलसेलग्रस्त आहोत, वाहक आहोत की आपल्याला सिकलसेल नाही, याबाबत खात्री करून घ्यावी, असे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे म्हणाले. यावेळी गर्भजल परीक्षण करून आलेल्या जोडीदारांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच सिकलसेल रुग्णांना प्रमाणपत्र, रक्त संक्रमण कार्ड वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन संतोष चात्रेशवार यांनी तर आभार भारती तितरे यांनी मानले. कार्यक्रमाला परीचारीका प्रशिक्षण केंद्राच्या प्राचार्य पुष्पा पोडे, सिकलसेल रुग्ण लाभार्थी, तसेच रुग्णालयातील अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.



# लोकशाहीचा अपमान करणाऱ्या संविधान विरोधकांच्या विरोधातील लढा तीव्र करा

## ना.श्री.सुधीर मुनगंटीवार यांचे 'आणीबाणी निषेध सभेत' आवाहन

## नागरिकांनी दिल्या 'आणीबाणीचा निषेध असो'च्या घोषणा







**चंद्रपूर । प्रतिनिधी**

देशगौरव पंतप्रधान नरेंद्रजी मोदी लोकसभा सदस्यत्वाची शपथ घेत असताना काँग्रेस आणि समाजवादी पार्टीचे काही नेते पोरकटपणा करीत होते. लोकशाहीचा आणि संविधानाचा अपमान करीत होते. पण मला त्याचे नवल वाटले नाही, कारण संविधानाचा अपमान करण्याची त्यांची वृत्ती जुनी आहे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानातील तरतुदींचा दुरुपयोग करीत या देशावर ४९ वर्षांपूर्वी आणीबाणी लादण्याचे कामही यांनीच केले होते. त्यामुळे लोकशाहीचा अपमान करणाऱ्या संविधान विरोधकांच्या विरोधातील लढा अधिक तीव्र करा, असे आवाहन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

चंद्रपूर येथील गांधी चौकात आयोजित आणीबाणी निषेध सभेत ना. मुनगंटीवार बोलत होते. यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, ज्येष्ठ नेते प्रमोद कडू, विजय राऊत, रमेश भुते, महानगर अध्यक्ष राहुल पावडे यांची प्रमुख उपस्थिती होती.आणीबाणीमध्ये कारावास भोगणारे आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी संविधान बचाओ काँग्रेस हटाओ असा नारा देत कुटुंबापासून लांब कारावासात राहणारे नारायणराव पिंपळापुरे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. यावेळी 'निषेध असो निषेध असो आणीबाणीचा निषेध असो, भारत माता की जय, वंदे मातरम, जो हमसे टकराएगा मिट्टी में मिल जाएगा' अश्या घोषणा उपस्थितांनी दिल्या.

ना. मुनगंटीवार म्हणाले, '४९ वर्षांपूर्वी २५ जून १९७५ हा देशाच्या लोकशाहीतील काळा दिवस होता. तत्कालीन पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांनी निवडणुकीत गैरव्यवहार केला आणि सरकारी अधिकाऱ्यांचा गैरवापर केला त्यामुळे त्यांना अपात्र ठरविण्याचा धाडसी निर्णय अलाहबाद उच्च न्यायालयाने १२ जून १९७५ ला दिला. वाघाच्या छातीचे न्यायमूर्तींनी संविधानाच्या तरतुदीनुसार 'या देशात कुणी छोटा नाही कुणी मोठा नाही,' या भावनेने न घाबरता निर्णय दिला. पण काँग्रेसने सर्वोच्च न्यायालयात जाण्याऐवजी संविधानाच्या तरतुदीचा दुरुपयोग करीत स्वतःच्या स्वार्थासाठी, स्वतःच्या कुटुंबाला संविधानापेक्षा मोठे सिद्ध करण्यासाठी राष्ट्रपतींवर दबाव टाकून या देशात आणीबाणी लावली. आज त्याच आणीबाणीचा निषेध करण्यासाठी आपण एकत्र आलेलो आहोत.' 'आणीबाणीमध्ये वर्तमानपत्रात एकही शब्द विरोधात लिहिता येत नव्हता. आकाशवाणी असो वा दूरदर्शन असो, स्व. इंदिरा गांधी किंवा काँग्रेसच्या विरोधात एकही शब्द उच्चारला तर अधिकाऱ्याची गच्छंती व्हायची. माझे वडील संघाच्या शाखेत जाऊन 'नमस्ते सदा वत्सले' म्हणतात म्हणून त्यांना १९ महिने तुरुंगात टाकण्यात आले होते. पण घरी अन्न धान्य नसताना, आर्थिक अडचणी असताना देशाच्या लोकशाहीच्या रक्षणासाठी १९ महिने घरावर तुळशीपत्र ठेवून तुरुंगवास भोगणाऱ्या सर्व राष्ट्रभक्तांना माझा सलाम आहे. एकाही राष्ट्रभक्ताने स्व. इंदिरा गांधी यांची क्षमा मागितली नाही. संविधानाचे रक्षण करणे आपली जबाबदारी आहे, हे समजून जीवन समर्पित केले. श्रद्धेय अटलजी, अडवाणीजी, जॉर्ज फर्नांडिसजी देखील कारागृहात होते. अश्या देशभक्तांचा आपल्याला अभिमान आहे. कारण त्यांनी अत्यंत वाईट परिस्थितीवर मात करीत 'भारत माता की जय' म्हणत तुरुंगवास सहन केला,' अश्या भावनाही ना. मुनगंटीवार यांनी व्यक्त केल्या.

**काँग्रेससाठी 'मेरा परिवार, मेरा देश'!**

तुर्कमान गेटवर असलेल्या आमच्या मुस्लीम परिवारांची हजारो घरे तोडून टाकली. हिंदू, मुस्लीम, शिख, इसाई बद्दलचे प्रेम न करता आपली खुर्ची वाचली पाहिजे, हेच काँग्रेसचे लक्ष्य होते. एक काँग्रेस नेता स्व. इंदिराजींना विनंती करायला गेला की,आपण खुर्ची वाचविण्यासाठी संविधानाचा दुरुपयोग करीत आहोत. तर दुसऱ्या दिवशी त्यालाही तुरुंगात टाकले. कारण त्यांच्यासाठी 'मेरा परिवार मेरा देश' हाच नारा होता. आज देशगौरव पंतप्रधान मोदीजी म्हणतात 'मेरा देश, मेरा परिवार है'. आपला लढा आजही देशासाठी आणि संविधानाच्या रक्षणासाठी आहे. काँग्रेसने संविधानाचा अपमान करण्यात कुठेही कसर सोडली नाही. आपण संविधानाचे रक्षण करीत आलो आणि आजही संविधानाच्या रक्षणाचाच संकल्प करीत आहोत,' असेही ना. मुनगंटीवार म्हणाले.

**हुकुमशाही प्रवृत्तीला जागेवर ठेचण्याचा संकल्प करा**

काँग्रेसचे लोक जातीचा प्रचार करून, लोकांमध्ये भिती निर्माण करून सत्तेत येत गेले. त्या काँग्रेसच्या राज्यात श्यामा प्रसाद मुखर्जींना स्लो पॉयझन देणारा, पं. दिनदयाल उपाध्याय यांची निर्घुण हत्या करणारा आरोपी कधीच सापडला नाही. काँग्रेसला जिथे अडचण आली, तिथे संशयास्पद घटना घडल्या आहेत. काँग्रेस पक्ष सत्तांध होऊन लोकशाहीच्या विरोधात कृती करीत आला आहे. आज आणीबाणीच्या त्या दुर्दैवी घटनेचे स्मरण करून येथून जातांना अशा हुकुमशाही प्रवृत्तीला जागेवर ठेचायचे आहे आणि लोकशाहीचा मंगलकलश आपल्या हाती येण्यासाठी बलिदान देणाऱ्यांची जाणीव ठेवायची आहे, एवढाच संकल्प करा, असे आवाहनही ना. श्री. मुनगंटीवार यांनी केले.

**फक्त निषेध नको!**

देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्वांत तीव्र आंदोलन चिमूरमध्ये झाले. १६ ऑगस्ट १९४२ ला युनियन जॅक खाली आला आणि तिरंगा फडकला. अशा वाघाच्या भूमीतील आपण नागरिक आहोत. त्यामुळे आणीबाणीचा फक्त निषेध करून थांबता येणार नाही. संविधानाचा अपमान करणाऱ्यांच्या आणि संसदेत पोरकटपणा करणाऱ्यांच्या विरोधातील लढा अधिक तीव्र झाला पाहिजे, असेही ना.मुनगंटीवार म्हणाले.


# तंत्रज्ञान सामायिक परीक्षेत नवकिरण व निदा अव्वल

**पुलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारकडून अभियांत्रिक तंत्रज्ञान अभ्यासक्रम प्रवेशासाठी एमएच-सीईटी घेण्यात आलेल्या राज्य सामाईक प्रवेश परीक्षा मधे पुलगाव शहरातून प्रथम मुलांमध्ये नवकिरण मदन ढगे यांना ९९ पर्सेंटाइल मार्क कमवून प्रथम आला. अत्यंत गरीब कुटुंबातील असलेल्या नवकिरणने दहावी बोर्डात शहरातून प्रथम येण्याचा मान पटकावला होता.

पुलगाव शहरातून मुलीमधे निदा राशिद कामिल ९७.१३ पर्सेंटाइल मिळवून प्रथम आली. या





यशासाठी पुलगाव शहरातील गणमान्य व्यक्ती कडून अभिनंदन करण्यात आले. उभयतांना प्रशांत इंगोले यांनी वेळोवेळी उचित मार्गदर्शन केले.

# लोकसभेतील विजयामुळे विरोधकांची छाती फुगली

**मुंबई**–महाराष्ट्र विधानसभा पावसाळी अधिवेशन उद्यापासून सुरू होत आहे. तत्पूर्वी विरोधकांकडून चहापानावर बहिष्कार टाकला गेला. त्यानंतर सरकारच्या वतीने पत्रकार परिषद घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अधिवेशनाची भूमिका स्पष्ट केली. तर लोकसभेतील विजयामुळे विरोधक छाती फुगवून मीडियासमोर आले आहेत. पण हा आनंद फार काळ टिकणार नाही, हा क्षणिक आनंद त्यांना घेऊ द्या, असा हल्लाबोल शिंदे यांनी विरोधकांवर केला.मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, विरोधकांची चर्चा करण्याची इच्छा नाही. दिलेल्या पत्रात कोणतेही मुद्दे नाहीत. तेच तेच ते मुद्दे त्या पत्रात मांडले जात आहेत. खोटे बोल रेटून बोलण्याची यांची मानसिकता आहे. स्वतःची पाठ थोपटून घ्यायची ही त्यांची प्रवृत्ती आहे. या निवडणुकीत कोणाचे अपयश आहे. गावागावात जाऊन खोटं नरेटिव्ह पसरवून तुम्ही लोकसभेत यश मिळाले आहे. त्यामुळे छाती फुगून यावेळी विरोधक मीडियासमोर आले असतील.

# पुलगावची जान्हवी पंड्या मिस इंडियामध्ये सहभागी

**पुलगाव । प्रतिनिधी**

शहरातील कन्या जान्हवी पंड्या हिने प्रतिष्ठित मिस इंडिया स्पर्धेत भाग घेतला.मिस इंडिया स्पर्धेत घेणारी जान्हवी ही पुलगावची पहिली मुलगी आहे. तिचे लहान वय असूनही, जान्हवीने अविश्वसनीय प्रतिभा आणि दृढनिश्चय दर्शविला आहे.तिने ऑडिशनमध्ये सर्वांना प्रभावित केले आहे. ही उल्लेखनीय कामगिरी पुलगावकरांसाठी अभिमानाची बाब आहे. जान्हवीने या अतुलनीय प्रवासाला सुरुवात करताना पुलगावच्या सर्व रहिवाशांकडून पाठिंबा आणि शुभेच्छा मागितल्या आहेत.




# पोलिस पाटील संघटनेची आढावा बैठक

**सेवाग्राम । प्रतिनिधी**

येथील शांती निवास भवन बापु कुटी, येथे महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील महासंघचे राज्य उपाध्यक्ष धनराज बलवीर यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये जिल्हा अध्यक्ष प्रमोद महाजन यांची राज्य कार्यकारिणीमध्ये निवड झाल्यामुळे रिक्त झालेल्या जिल्हाध्यक्ष पदासाठी सर्वानुमते सुभाष खोबे यांची निवड करण्यात आली. तसेच पोलीस पाटील सेवेत असताना मृत्यू पावल्यास कुटुंबियांना रु पाच लाख रोख मदत शासना तर्फे देण्यात यावी,या करिता येणाऱ्या पावसाळी अधिवेशनात हा मुद्दा मांडावा. या संबंधी सर्व आमदार यांना निवेदन देण्यासंबंधी चर्चा करण्यात आली. नवनियुक्त



जिल्हाध्यक्ष सुभाष खोबे यांचे सर्वांनी अभिनंदन केले.

या बैठकीचे उत्तम आयोजन प्रमोद महाजन यांनी केले तर प्रास्ताविक अविनाश घोरपडे यांनी केले. आभार प्रदर्शनात समिर डाखोळे यांनी आयोजक व बैठकीला उपस्थित सर्व सेवाग्राम, सेलू, समुद्रपूर पोलीस स्टेशन मधील पोलीस पाटील यांचे आभार मानले व भोजनाचा कार्यक्रमाने या बैठकीची सांगता करण्यात आली.

# घरचे बियाणे उगवले,कृषि केंद्रवाले चक्रावले कपाशी बी.जी.३ साठी शेतकरी आग्रही

**सिंदी रेल्वे । प्रतिनिधी**

या वर्षी प्रथमच सोयाबीनचे घरगुती बियाणे शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात वापरले आणि शतप्रतिशत ते उगवले देखील.तसेच प्रतिबंधित बी.जी.-३ कपाशी बियाण्याची मोठ्या प्रमाणात विक्री झाली व समस्त शेतकऱ्यांचा हंगाम सजला परिणामी,प्रत्येक कृषि सेवा केंद्रात यंदा सर्वच प्रकारचे बियाणे पडून आहे.बियाणे परत घेण्यास जिल्हा वितरक राजी नसल्याची चर्चा असून बरेच व्यापारी त्यामुळे चक्रावल्याचे जाणवत आहे.

दरवर्षी,खरीप हंगामात रग्गड कमाई करता यावी,म्हणून सर्व साधारण कृषि सेवा केंद्र चालक अमाप बी-बियाण्यांचा साठा करतात.हंगामात बियाण्यांची टंचाई जाणवते,हे लक्षात घेऊन यंदा ६३ टक्के सोयाबीन उत्पादक शेतकरी बंधुंनी उन्हाळी बियाण्याची तजवीज केली होती.मृग नक्षत्राचा पाऊस उशिरा पण दमदार झाला.शिवाय वरचेवर सरी बरसल्यामुळे कपाशी आणि सोयाबीनची उगवण शक्ती जबरदस्त दिसून आली.पेरण्या उलटण्याचा धोका टळल्यामुळे थकबाकी बियाण्यांचे काय? हा प्रश्न विक्रेत्यांना सतावत आहे,हे मात्र खरे.यावर्षी पुन्हा मृगाचा पाऊस नियोजित वेळी पडला नाही,त्यामुळे धूळ पेरणी धोक्यात येण्याची शक्यता बळावली होती.परंतु , १८,२०आणि२१ जून रोजी या भागात सरासरी ४७ मि.मी.पर्जन्यवृष्टी झाली. रविवारी (२३ जून) केवळ तीन मि.मी.पाऊस पडला.त्यामुळे शेतकऱ्यांवरील संकट टळले,असे मानल्या जात आहे.आजमितीला ९२ टक्के लागवड अथवा पेरण्या झाल्यात.काही भागात शतप्रतिशत पेरण्या आटोपल्या असून रान हिरवेगार दिसते आहे.मजुरां अभावी ज्यांच्या शेताची कामे खोळंबली होती,त्यांना आता मंजूर सहज उपलब्ध होतांना दिसते.यंदा बी-बियाणे जमिनीत टाकताच तणनाशकांची फवारणी करण्याची घाई करतांना शेतकरी दिसत आहेत.काहींनी रासायनिक खतांचे नियोजन करणे देखील सुरु केले आहे.

# शालेय विद्यार्थ्यांच्या बस थांब्याच्या शेडवरून काँग्रेसने राजकारण करू नये–नरेंद्र नुने

**घुग्घुस । प्रतिनिधी**

येथील माजी जनरल सेक्रेटरी एसकेएमएस (एआयटी युसी) युनियनचे माजी श्रमिक कामगार नेते नरेंद्र चंद्रय्या नुने यांनी वेकोलिचे उपक्षेत्रीय प्रबंधक यांना निवेदन देत वेकोलि परिसरातील शालेय विद्यार्थ्यांकरिता असलेल्या बस थांब्याचे शेड बनविण्याची मागणी केली होती.



वेकोलि वसाहतीच्या युको बँक, इंदिरानगर, सुभाषनगर, रामनगर, बंगाली कॅम्प याठिकाणी शालेय विद्यार्थ्यांकरिता बस थांब्याचे शेड आहे. शेड खराब अवस्थेत असल्याने विद्यार्थ्यांना उन्हात व पावसात उभे राहावे लागते. ही समस्या लक्षात घेत निवेदनातून मागणी करण्यात आली होती.निवेदन देऊन एका वर्षाचा कालावधी होऊन गेला परंतु बस थांब्याचे शेड बनविण्यात आले नाही. परंतु काही काँग्रेस नेते बस शेडच्या कंत्राटाबद्दल गुप्त माहिती मिळविण्यासाठी याचे श्रेय घेण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप माजी श्रमिक कामगार नेते नरेंद्र चंद्रय्या नुने यांनी केला आहे.

# गोंडवाना विद्यापीठातील खेळाडूंची आंतर विद्यापीठ मिनी गोल्फ स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी

**गडचिरोली । प्रतिनिधी**

राजस्थानातील जे.जे. टी. विद्यापीठ, झुंझुनू येथे अखिल भारतीय आंतरविद्यापीठ मिनी गोल्फ स्पर्धा दि. ७ ते १० जुन २०२४ या कालावधीत पार पडली.या आंतर विद्यापीठ मिनी गोल्फ स्पर्धेमध्ये गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली संघाने उत्तम खेळाचे प्रदर्शन करत पुरुष व महिला अशा दोन्ही गटात पदके पटकाविली.या स्पर्धेमध्ये स्ट्रोक इव्हेंटमध्ये पुरुष व महिला गटाने ब्राँझ पदक प्राप्त करत तिसरे स्थान पटकाविले. तसेच सिंगल स्ट्रोक इव्हेंटमध्ये पुरुष गटाने ब्राँझ पदक प्राप्त करत चौथे तर डबल स्ट्रोक इव्हेंटमध्ये तिसरे स्थान पटकाविले.



त्यासोबतच, टिम इव्हेंटमध्ये महिला गटाने ब्राँझ पदक प्राप्त करत तिसरे स्थान पटकाविले. तर डबल स्ट्रोक इव्हेंटमध्ये सिल्वर पदक प्राप्त करत दुसरे स्थान पटकाविले.खेळाडूंच्या उत्तम प्रदर्शनाचे गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, प्र-कुलगुरु डॉ. श्रीराम कावळे, कुलसचिव डॉ. अनिल हिरेखन, क्रीडा व शारिरीक शिक्षण विभागाच्या संचालक डॉ. अनिता लोखंडे यांनी अभिनंदन केले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .